


वेचक-**वेधक**

# क्वान्टम हाय टेक सीसीटीव्ही एचडी २एमपी

कन्झ्युमर इलेक्ट्रॉनिक्स आणि उच्च दर्जाची आयटी पेरिफेरल्स यांच्यामधील भारतातील आघाडीची कंपनी असलेल्या क्यूएचएमपीएलने क्वान्टम हाय टेक या ब्रँड नावाखाली परवडण्यायोग्य किंमतीमध्ये एएचडी डोम आणि बुलेट स्टाईल कॅमेरासह हाय डेफिनेशन व्हिडीयो आणि १९२०x१०८० पिक्सेलपर्यंत रेझोल्युशन देऊ करणारी ११ मॉडेल्स दाखल केली आहेत.

सुरक्षा आणि सर्व्हेलन्स यांच्या वाढत्या गरजा पूर्ण करणाऱ्या डोम कॅमेऱ्यांमध्ये आयआर-कट फिल्टरसह डे/नाईट सर्व्हेलन्सची सुविधा देऊ करण्यात आली आहे. यांतील ३६ बिल्ट-इन आयआर एलईडी ३० मीटर्सपर्यंतची आयआर रेंज आणि दिवस असो या रात्र, उत्कृष्ट दर्जाच्या इमेज देऊ करतात. बुलेट कॅमेरा ५० मीटर्सची रेंज देत असून त्यांमध्ये ७२ आयआर एलईडी असतात. हे कॅमेरा काळोख्या वातावरणामध्ये आपोआप ब्लॅक/व्हाईट मोडला जातात. त्यांना ०Lux@F१.२ (खठ जछ) इतक्या किमान इल्युमिनेशनची आणि १२ व्हीडीसीची जोड मिळाल्याने वापरकर्त्यांना काळोख्या पर्यावरणातही उत्कृष्ट दर्जाच्या इमेज टिपणे शक्य होते, तात्पर्याने, तुमच्या कुटुंबाच्या सुरक्षिततेविषयी अधिक आश्वस्तता मिळणे शक्य होते.

हे नवे एएचडी कॅमेरा दोन्ही एएचडी कॅमेरा आणि जुने ॲनालॉग कॅमेरा तसेच आयपी कॅमेऱ्यांसोबत कंपॅटिबल असणाऱ्या एएचडी डिजिटल रेकॉर्डर्स (डीव्हीआर)सोबत कंपॅटिबल आहेत. त्यामुळे वापरकर्त्यांना ॲप्लिकेशनच्या गरजेनुसार अधिकाधिक पर्याय मिळणे शक्य होते.

३,२९५/- रूपये ते ४,९७५/- रुपये इतक्या रेंजमध्ये आणि २ वर्षांच्या वॉरंटीसह उपलब्ध असलेले हे एएचडी कॅमेरा सर्वोत्तम कामगिरी आणि आयआर कॉन्स्टण्ट करण्ट डिझाईन, ईएसडी आणि सर्ज प्रोटेक्शन अशा सुरक्षा पुरवते. हे उत्पादन तुमच्या जवळच्या सीसीटीव्ही इन्स्टॉलर्सकडे उपलब्ध असेल.